प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. २३.०५.२०२०**

## सिडकोच्या नळ जोडणी धारकांना पुढील ६ महिने जुन्या दराने देयके प्राप्त होणार
## कोविड - १९ च्या पार्श्वभूमीवर सिडकोचा निर्णय

सध्या जगभर पसरलेल्या कोविड **-** १९ या राष्ट्रीय आपत्तीच्या पार्श्वभूमीवर सिडको महामंडळाने पाण्याची देयके सुधारित दराने वसूल करण्याचा निर्णय ६ महिने पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. ग्राहकांना या निर्णयाच्या अनुषंगाने सुधारित देयके दिली जाणार नाहीत. सुधारित दरानुसार यापूर्वी आकारण्यात आलेली देयकाची अतिरिक्त रक्कम पुढील देयकामध्ये जुन्या दरांनुसार आकारण्यात येईल. इतर शासकीय यंत्रणांकडून पाण्याची खरेदी व त्याचप्रमाणे पाणी पुरवठ्याची साधने आणि पाईपलाईन्सच्या देखभालीसाठी येणारा खर्च लक्षात घेता सदरची दरवाढ ही तब्बल १५ वर्षांनंतर म्हणजेच बऱ्याच कालावधीने करण्यात आली होती.

नवी मुंबई क्षेत्रातील सिडकोच्या व्यापारी, सामाजिक व धर्मादाय संस्था तसेच निवासी वापराच्या नळ जोडण्यांकरिता आणि सिडकोच्या हेटवणे धरणातून पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या गावांकरिता फेब्रुवारी-मार्च 2020 च्या देयकापासून सुधारित पाणी दर लागू करण्यात आली होती. सदरची दरवाढ ही जानेवारी २०२० पासून करून फेब्रुवारी - मार्च २०२० च्या देयकात समाविष्ट करण्यात आली होती.

कोविड - १९ च्या पार्श्वभूमीवर सिडकोतर्फे घेण्यात आलेला निर्णय ग्राहकांसाठी या कठीण काळात नक्कीच दिलासादायक ठरेल.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**